# मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
## कार्यालय : प्रकल्प संचालक (आत्मा), छत्रपती संभाजीनगर
शहानुर मिया दर्गा चौक, श्रेय नगर, छत्रपती संभाजीनगर- ४३१००१

ई मेल : aurangabad.diu.smart@gmail.com दुरध्वनी क्रमांक : ०२४०-२३३४५८२


जाक्र/स्मार्ट/ MIS change/316/२०२४. दिनांक: १३ /०३/२०२४.

प्रति,

MIS तज्ञ
प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट, कृषि
पुणे.

विषय :- मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत कृषि समर्पण फार्मर प्रो. क. लि च्या Procurment MIS पोर्टलवर बदल करणे बाबत

उपरोक्त विषयास अनुसरून जागतिक बँक अर्थ सहाय्यित मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत कृषि समर्पण फार्मर प्रो. क. लि (AGR५१५४१४१५४९४५८०००२) चे MIS पोर्टलवर Procurment मध्ये **Work** - contruction of civil work and PEB १२०० Sq.mtr.for Processing Unit,Cold Storage with Precooling Unit Ripening Chamber,Blast Freezer and Integrated Packhouse ची सिबीओ ने प्रस्तावित केलेली किंमत रक्कम रु. १९८८४०००.०० व **Goods**- Supply Installation,Commisioning and Testing Testing Of Refrigeration System and Machineries of Processing Unit,Cold Storage with Precooling Unit Ripening Chamber,Blast Freezer and Integrated Packhouse(Puf Pannel and Machinery) ची सिबीओ ने प्रस्तावित केलेली किंमत रक्कम रु. २००१८०००.०० मध्ये विभागणी झाल्यामुळे Works व Goods ची विभागणी वरीलप्रमाणे MIS Portal वर अद्ययावत करून मिळावे. जेणे करून जिल्हा स्तरावरून माहिती अद्ययावत करता येईल

**सोबत:-** मंजूरी आदेश

**प्रमुख,**
**जिल्हा अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प तथा**
**प्रकल्प संचालक (आत्मा)**
**छत्रपती संभाजी नगर**

प्रत ,
मा. नोडल अधिकारी विभागीय अंमलबजावणी कक्ष स्मार्ट छत्रपती संभाजी नगर यांना माहितीस्तव सविनय सादर.

मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
कार्यालय : प्रकल्प संचालक (आत्मा), छत्रपती संभाजीनगर
शहानुर मिया दर्गा चौक, श्रेय नगर, छत्रपती संभाजीनगर - ४३१००१
ई मेल : aurangabad.diu.smart@gmail.com दुरध्वनी क्रमांक : ०२४०-२३३४५८२

जा.क्र./स्मार्ट/सआसं/निदमुपा/ ८५० /२०२३ दिनांक : १० / १०/२०२३

प्रति,

मा. प्रमुख
विभागीय अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प
विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

विषय :- मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत कृषि समर्पण फार्म प्रोड्युसर कंपनी लि. बिडकीन, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांचे मंजूर उप प्रकल्पातील बाबीकरिता संपादणूक प्रक्रिया राबविण्यासाठी निविदा दस्तऐवजास पुर्व मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :- १) उपप्रकल्प मंजुरी आदेश पत्र जा.क्र./कृ.आ./आत्मा/स्मार्ट/मु.उ.मं.आ./२०३९/२०२३ दि.०७/०७/२०२३
२) समुदाय आधारित संस्था संपादन मार्गदर्शक पुस्तिका जुलै २०२३
३) मा.प्रकल्प संचालक, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट, पुणे यांचे संपादणुक संदर्भात सुधारित मार्गदर्शक सुचनेचे पत्र जा.क्र.स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र.अ.क./सीबीओ/संपादण/६३२/२०२३ दि.१२/०९/२०२३.
४) कृषि समर्पण फार्म प्रोड्युसर कंपनी लि. बिडकीन, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर या समुदाय आधारित संस्थेचे पत्र क्र.१८ दि. ०५/१०/२०२३.

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, स्मार्ट प्रकल्पांतर्गत कृषि समर्पण फार्म प्रोड्युसर कंपनी लि. बिडकीन, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांचे मंजूर उपप्रकल्पातील खालील बाबींची संपादन प्रक्रिया सुरु करण्यासाठी समुदाय आधारीत संस्थेद्वारे निविदा दस्तऐवज तयार करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने दि. १५/०९/२०२३ रोजी जिल्हास्तरीय संपादणूक संपादन समिती यांच्या बैठकीमध्ये सदरील दस्त ऐवजामधील त्रुटी संबंधित सिबिओना कळविण्यात आलेल्या होत्या.

संदर्भ क्र.४ अन्वये कृषि समर्पण फार्म प्रोड्युसर कंपनी लि. बिडकीन, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्रुटीची पूर्तता करून यांचे मंजूर उपप्रकल्पातील खालील दिलेल्या बाबीकरिता संपादणूक प्रक्रिया राबविण्यासाठी निविदा दस्तऐवजास पुर्वमान्यता मिळणेकरीता वरिष्ठ कार्यालयास पाठविण्यासाठीचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

| Sr. No. | Name of Activity | Goods / Works | Estimated Amount (Rs. in Lakhs) | Procurement Method |
|---|---|---|---|---|
| 1 | Construction of civil work and PEB for processing unit, cold storage, Blast Frezer, Ripening Chambers with precooling unit and integrated packhouse | Works (W-2) | १९८.८४ | Local Competitive Bidding (LCB) |
| | | एकुण | १९८.८४ | |

मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
कार्यालय : प्रकल्प संचालक (आत्मा), छत्रपती संभाजीनगर
शहानुर मिया दर्गा चौक, श्रेय नगर, छत्रपती संभाजीनगर - ४३१००१
ई मेल : aurangabad.diu.smart@gmail.com दुरध्वनी क्रमांक : ०२४०-२३३४५८२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | CA Cold Storage Capacity : 500 Mt (250Mt * 2 Chamber )<br>Precooling units 30 Mt (15 Mt * 2 Chamber )<br>Ripening Chambers 30 Mt (10 Mt * 3 Chamber )<br>Blast Frezer (1Mt)<br>Integrated Pack House (300 Sq. Meter) | Goods (E-2) | २००.१८ | Local Competitive Bidding (LCB) |
| 2 | Automatic sweet lime shorting cleaning grading 5 TPH | | ४४.२५ | |
| | | एकुण | २४४.४३ | |

प्राप्त प्रस्तावातील उपरोक्त नमूद बाबींच्या निविदा दस्तऐवजाची जिल्हा अंमलबजावणी कक्षातील CBO स्तरावरील संपादन समितीने तपासणी केलेली असून प्राप्त निविदा दस्तऐवजास संदर्भ क्र. २ व ३ च्या परिपत्रकानुसार पुर्वमान्यता मिळणेकरिता निविदा दस्तऐवज सादर करण्यात येत आहे.

सोबत :- वरीलप्रमाणे निवीदा दस्त ऐवज.

प्रमुख, जिल्हा अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प तथा
प्रकल्प संचालक (आत्मा), छत्रपती संभाजीनगर

प्रत,

मा.प्रकल्प संचालक, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
कार्यालय : विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद
क्रांती चौक जवळ, अदालत रोड, औरंगाबाद - ४३१००१
ई मेल : aurangabad.riu.smart@gmail.com दुरध्वनी क्रमांक : ०२४०-२३३१०९४

जा.क्र./स्मार्ट/सआसं/कृषिसमर्पण/निदपुमा/ २८७ /२०२३. दिनांक: १३/१०/२०२३

प्रति,

प्रमुख, जिल्हा अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प तथा
प्रकल्प संचालक (आत्मा), औरंगाबाद.

**विषय :- मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत कृषिसमर्पण फार्म प्रोड्युसर कंपनी लि., बिडकीन, ता.पैठण, जि.औरंगाबाद यांचे मंजूर उप प्रकल्पातील बाबीकरिता संपादणूक प्रक्रिया राबविण्यास तसेच निविदा दस्तऐवजास पुर्वमान्यता देणे बाबत.**

संदर्भ :- १) उपप्रकल्प मंजुरी आदेश पत्र जा.क्र.कृ.आ./स्मार्ट/मु.उ.मं.आ./२०३९/२०२३ दि.०७/०७/२०२३.
२) संपादन मार्गदर्शक सूचना जा.क्र.पी.सी.एम.यु./स.आ.सं.(CBO)/संपादन/१२७१/२०२२ दि.२९/०८/२०२२.
३) मा.प्रकल्प संचालक, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट, पुणे यांच्या संपादणुक संदर्भात मार्गदर्शक सूचना जा.क्र.स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र.अ.क./संपादन/११०/२०२३ दि.१९/०१/२०२३.
४) मा.प्रकल्प संचालक, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट, पुणे यांचे संपादणुक संदर्भात सुधारित मार्गदर्शक सुचनेचे पत्र जा.क्र.स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र.अ.क./सीबीओ/संपादण/६२५/२०२३ दि.११/०४/२०२३.
५) मा.प्रकल्प संचालक, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट, पुणे यांचे संपादणुक संदर्भात सुधारित मार्गदर्शक सुचनेचे पत्र जा.क्र.स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र.अ.क./संपादण/१४८६/२०२३ दि.१७/०८/२०२३.
६) मा.प्रकल्प संचालक, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट, पुणे यांचे संपादणुक संदर्भात सुधारित मार्गदर्शक सुचनेचे पत्र जा.क्र.स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र.अ.क./संपादन/६३२/२०२३ दि.१२/०९/२०२३.
७) नोडल अधिकारी, जिल्हा अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प, प्रकल्प संचालक (आत्मा) कार्यालय, औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.स्मार्ट/सआसं/निदपुमा/८५०/२०२३ दि.१०/१०/२०२३.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, स्मार्ट प्रकल्पांतर्गत कृषिसमर्पण फार्म प्रोड्युसर कंपनी लि., बिडकीन, ता.पैठण, जि.औरंगाबाद यांचे मंजूर उपप्रकल्पातील खालील बाबींची संपादन प्रक्रिया सुरु करण्यासाठी समुदाय आधारीत संस्थेद्वारे निविदा दस्तऐवज तयार करण्यात आलेले आहे. संदर्भ क्र.६ अन्वये या कार्यालयास रक्कम रु.१५०.०० लक्षापुढील पुर्वमान्यतेचे अधिकार असल्यामुळे जिल्हा अंमलबजावणी कक्षातील सीबीओ स्तरावरील संपादन समितीच्या शिफारसीसह संदर्भ क्र.७ अन्वये पुर्वमान्यतेकरिता प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
कार्यालय : विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद
क्रांती चौक जवळ, अदालत रोड, औरंगाबाद - ४३१००१
ई मेल : aurangabad.riu.smart@gmail.com दुरध्वनी क्रमांक : ०२४०-२३३१०९४

| Sr. No. | Name of Activity | Goods / Works | Estimated Amount (Rs. in Lakhs) | Procurement Method |
|---|---|---|---|---|
| 1 | Construction of Civil Work and PEB 1250 Sq. Mtr. for Processing Unit, Cold Storage with Precooling Unit, Ripening Chambers, Blast Freezer and Integrated Packhouse | Works (W-2) | 198.84 | Local Competitive Bidding (LCB) |
| 2 | Supply, Installation, Commissioning and Testing of Refrigeration System and Machineries of Processing Unit, Cold Storage, Pre-Cooling, Ripening Chambers, Blast Freezer and Integrated Pack House (Puf Panel and Machinery) | Goods (E-2) | 244.43 | |

प्राप्त प्रस्तावातील उपरोक्त नमूद बाबींच्या निविदा दस्तऐवजाची विभागीय अंमलबजावणी कक्षातील सीबीओ स्तरावरील संपादन समितीने तपासणी केलेली असून प्राप्त निविदा दस्तऐवजास संदर्भ क्र.२, ३, ४, ५ व ६ च्या मार्गदर्शक सूचना / परिपत्रकाच्या तसेच खालील अटी व शर्तीच्या आधिन राहून पुर्वमान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :

१) कृषिसमर्पण फार्म प्रोड्युसर कंपनी लि., बिडकीन, ता.पैठण, जि.औरंगाबाद या संस्थेने निश्चित केलेल्या तांत्रिक विनिर्देश (Technical Specification) मध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. सदर तांत्रिक विनिर्देशाची जबाबदारी संस्थेची राहील.

२) निविदा जाहिरात समुदाय आधारित संस्था संपादन मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यस्तरीय वृत्तपत्रात (राज्यातील सर्व जिल्ह्यात) प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

३) संपादन प्रक्रिया राबविणेसाठी सोबत जोडलेल्या सुधारित प्रपत्राचा Works (W-२) व Goods (E-२) (September २०२३) वापर करणे अनिवार्य आहे.

४) सदर निविदा दस्तऐवजातील संपूर्ण माहिती भरल्यानंतर निविदा प्रक्रियेची जाहिरात प्रसिद्ध करताना संपुर्ण निविदा दस्तऐवज (निविदा जाहिरात, निविदा दस्तऐवज Works (W-२), Goods (E-२) एकत्रित स्कॅन करुन पीडीएफ स्वरुपातील सॉफ्ट कॉपी ई-मेलद्वारे दोन दिवस अगोदर या कार्यालयास पाठविण्यात यावी. त्यानंतर सदर निविदा प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

५) जागतिक बँकेच्या नियमावलीचे पालन करण्यात यावे.

६) संपादन प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात यावी.

७) निविदा मागविण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून किमान २० दिवसाचा कालावधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
कार्यालय : विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद
क्रांती चौक जवळ, अदालत रोड, औरंगाबाद - ४३१००१
ई मेल : aurangabad.riu.smart@gmail.com दुरध्वनी क्रमांक : ०२४०-२३३१०९४

८) जर निविदा सादर करण्याच्या मुदतीत वाढ करावयाची असल्यास त्याबाबतचे शुद्धीपत्रक प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी (प्रसिद्धीसाठी या कार्यालयाशी संपर्क साधावा).

९) निविदा प्रसिद्ध झाल्यानंतर सदर निविदा प्रक्रियेत पुढील टप्प्यावर या कार्यालयामार्फत तांत्रिक मुल्यमापन अहवालाच्या दस्तऐवजाची तपासणी करुन पुर्वमान्यता घ्यावी.

वरील अटी व शर्तीच्या आधिन राहुन समुदाय आधारित संस्थेने पुढील संपादन प्रक्रिया तात्काळ राबवावी.

सोबत :- वरीलप्रमाणे निवीदा दस्तऐवज.

(उमेश घाटगे)
नोडल अधिकारी
विभागीय अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प
विभागीय कृषि सह संचालक कार्यालय
औरंगाबाद

प्रत,

१) मा.प्रकल्प संचालक, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट प्रकल्प, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष - कृषि, स्मार्ट प्रकल्प तथा संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) कृषिसमर्पण फार्म प्रोड्युसर कंपनी लि., बिडकीन, ता.पैठण, जि.औरंगाबाद यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

(उमेश घाटगे)
नोडल अधिकारी
विभागीय अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प
विभागीय कृषि सह संचालक कार्यालय
औरंगाबाद

सीबीओचे नाव :- कृषि समर्पण फार्म प्रोड्युसर कंपनी लि., ता.पैठण, जि. औरंगाबाद
उपप्रकल्प :- मोसंबी, सिताफळ यावर प्राथमिक प्रक्रिया, साठवणूक करून खरेदीदारास विक्री करणे .

वाचा :-१) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. कृव्यप्र/४६१९/ प्रक्र. ७०/८- अे दि. ११/०९/२०१९
२) मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समिती १५ वी सभा दि.२७.०६.२०२३ चे इतिवृत्त.

## मूल्यसाखळी उपप्रकल्प मंजूरी आदेश

संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये, मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाच्या प्रकल्प अंमलबजावणीस मान्यता देण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ अन्वये, मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत प्रकल्प संचालक, स्मार्ट यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समितीची १५ वी सभा संपन्न झाली.

उपरोक्त संदर्भीय सभेतील निर्णयानुसार **कृषि समर्पण फार्म प्रोड्युसर कंपनी लि., ता.पैठण, जि. औरंगाबाद** यांच्या मोसंबी, सिताफळ यावर प्राथमिक प्रक्रिया, साठवणूक करून खरेदीदारास विक्री करणे या उपप्रकल्पास मान्यता देण्यात येत आहे.

**सदर उपप्रकल्पातील घटक निहाय समितीने शासकीय मापदंडानुसार ग्राह्य केलेली रक्कम व स्मार्ट प्रकल्पातून देय अनुदान इ. बाबींचा तपशील खालील प्रमाणे :-**

| अ. क्र. | तपशील | सीबीओ प्रस्तावित उपप्रकल्प रक्कम (रु. लाख) | समितीने शासकीय मापदंडानुसार ग्राहय धरलेली रक्कम (रु. लाख) | समितीने मापदंडानुसार मंजूर केलेले अनुदान (रु. लाख) | मापदंडाची योजना |
|---|---|---|---|---|---|
| १ | Cold storage ५०० MT | ३९९.०२ | ६०.०० | ३६.०० | SMART |
| २ | Pre cooling unit ३० MT ६x५ MT | | १२५.०० | ७५.०० | MOFPI Cold chain C१ |
| ३ | Ripening chambers ३x१० MT | | ३०.०० | १८.०० | MOFPI Cold chain C१ |
| ४ | Integrated Pack house (३००Sq.mtr)४TPH (१८mx९m) | | ५०.०० | ३०.०० | MIDH |
| ५ | Blast freezer १ MT | | ३५.०० | २१.०० | MOFPI Fruits & veg. A३.१ |
| ६ | Automatic sweet lime sorting, cleaning, grading ५ TPH | ४४.२५ | ४४.२५ | २६.५५ | MOFPI Fruits & veg. A ७.४ |
| ७ | Crates २० Kg (१००० Qty) Rs २७५*१००० | २.७५ | २.७५ | १.६५ | MOFPI GN-L |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | RO systems २KLH | ३.४९ | ३.४९ | २.०९ | MOFPI GN-H१ |
| ९ | Fork lift (२०००Kg) | ८.७४ | ८.७४ | ५.२४ | MOFPI PMKSY C.५ -१७ |
| १० | Solar systems ८० kWp | ५२.०० | ४३.६४ | २६.१८ | MOFPI GN-G१ मार्गदर्शक सुचना निर्गमित होईपर्यंत अंमलबजावणी स्थगित |
| ११ | DG set ३०० KVA | ३४.३९ | १७.०३ | १०.२२ | MOFPI GN-B४ |
| १२ | Transformer ३०० KVA | | ४.२० | २.५२ | |
| | एकुण | ५४४.६४ | ४२४.१० | २५४.४६ | |
| १३ | ५ % Operative Expenditure | | २०.०० | १२.०० | कमाल मर्यादेत. |
| | एकुण एकंदर | | ४४४.१० | २६६.४६ | |

(टिप :- सोलार यूनिट हा घटक पुढील मार्गदर्शक सुचना निर्गमित होईपर्यंत स्थगित ठेवण्यात यावा.)

सदर उपप्रकल्पास सोबतच्या अटी व शर्तीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

**एकूण प्रकल्प किंमत:- रु.४४४.१० लाख**

**मंजूर अंतर व्यवहार्यता (VGF) निधी (अनुदान):- रु.२६६.४६ लाख**

**सोबत- अटी व शर्ती**

**दशरथ तांभाळे**
**प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा, कृषि**
**स्मार्ट प्रकल्प तथा कृषि संचालक, आत्मा**
**कृषि आयुक्तालय, पुणे**

---

जा.क्र.कृ.आ./स्मार्ट/मु.उ.मं.आ/२०३८/२०२३
दि. ०७/०७/२०२३

प्रति ,

अध्यक्ष/संचालक **कृषि समर्पण फार्म प्रोड्युसर कंपनी लि., ता.पैठण, जि. औरंगाबाद**
उपप्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी सुरु करावी.

प्रत :-

१) मा. प्रकल्प संचालक स्मार्ट, पुणे यांना महितीस्तव सविनय सादर.

२) विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, औरंगाबाद सदर प्रकल्पाची अंमलबजावणी व सनियंत्रण सोबतच्या अटी व शर्ती नुसार करण्यात यावे.

३) जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, औरंगाबाद सदर प्रकल्पाची अंमलबजावणी व सनियंत्रण सोबतच्या अटी व शर्ती नुसार करण्यात यावे.

# उपप्रकल्प अंमलबजावणी अटी व शर्तीचे प्रपत्र

उपरोक्त उत्पादक भागीदारी/ बाजार संपर्कवाढ उपप्रकल्पास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुरी देण्यात आलेली आहे.

१) समुदाय आधारित संस्थेकडील १) मार्केटेबल सरप्लस २) खरेदीदाराशी व्यक्तीशः बोलून कराराबाबतची खात्री याबाबत पीआययू, कृषिच्या उपप्रकल्पांसाठी प्रकल्प संचालक, आत्मा यांनी सत्यता तपासावी.

२) स्मार्ट प्रकल्पामध्ये सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करताना संबंधित संस्था जर यापूर्वी पोकरा व इतर योजनेचा लाभ घेतलेला असेल तर एकाच/त्याच बाबीसाठी/सुविधेसाठी पुन्हा स्मार्ट मधून अनुदानाची मागणी केलेली नाही याची खात्री प्रकल्प संचालक, आत्मा आणि अन्य पीआययू बाबत संबंधीत पीआययू, प्रमुखांनी त्यांच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मार्फत करावी.

३) प्रस्तावित मुल्यसाखळी पुर्ण होण्यासाठी अन्य योजनेतील घेतलेले घटक अथवा सीबीओनी स्वतः उभारणी करणे अपेक्षीत असलेले घटक शक्यतो पुर्ण झालेले असावेत किंवा त्यांची उभारणी सुरु झालेली असावी.

४) उपप्रकल्पामध्ये प्रस्तावित केलेले प्रक्रीया युनीटसाठीचे शेड तसेच मशीनरीसाठीचे शेड/ बांधकामाची आवश्यकता व क्षमतेची तपासणी पीआययु, कृषि बाबत RIU नी करावी. शेड/ बांधकाम घटकाची आवश्यकता व क्षमता निश्चित झाल्यानंतर SSR प्रमाणे अंदाजपत्रक व मूल्यांकनाच्या अटीवर सदर घटक मान्य करण्यात येत आहेत. सीबीओने अनावश्यक क्षमतेचे शेड/बांधकाम केल्यास आवश्यक तेवढयाच क्षमतेच्या शेड/बांधकामाचे मूल्यांकन करुन त्यानुसार अनुदान देण्यात येईल. अनावश्यक शेड/बांधकामास अनुदान देय राहणार नाही. तसेच प्रत्यक्ष बांधकामाचे मुल्यांकन करुनच अनुदान वितरीत करण्यात येईल.

५) सीबीओंनी प्रस्तावित केलेली मशीनरी ही ISI अथवा त्या दर्जाची असावी. सीबीओंनी खरेदी केलेल्या मशीनरीचे स्पेसीफिकेशन व क्षमता त्रयस्त यंत्रणेकडून तपासून पीआययूंनी अनुदान वितरणाची कार्यवाही करावी. पीआययू मार्फत आवश्यकतेनुसार विभागनिहाय / जिल्हानिहाय त्रयस्त यंत्रणांची निवड करावी. याबाबतचा येणारा खर्च डीआययू कडील आकस्मिक खर्चातून करावा. तसेच ज्या घटकांना ISI दर्जा लागू नाही असे घटक ISO दर्जाचे / प्रणालीचे घ्यावेत.

६) उपप्रकल्पाची अंमलबजावणी करताना सीबीओस आवश्यक Working Capital तसेच Operational Expenditure यासाठी सीबीओ स्वतः जबाबदार राहील, यासाठी प्रकल्पातून कोणतेही अनुदान देय राहणार नाही.

७) सीबीओमार्फत उभा करावयाच्या पायाभुत सुविधाकरीता आवश्यक विद्युत पुरवठा उपलब्धतेची खात्री पीआययूचे संबंधित जिल्हास्तरीय अधिकाऱ्याने केल्याशिवाय उपप्रकल्पाचे काम सुरु करु नये. प्रकल्प उभा राहीला आणि विद्युत पुरवठाच नाही अशी स्थिती होवू नये.

८) उपप्रकल्पामध्ये प्रस्तावित केलेल्या घटकाची रक्कम रु.१०.०० लाखाच्या आत असल्यास प्रस्तावित रक्कमेच्या ६०% अनुदान देय राहील. तथापि सदर घटकाची खरेदी स्पर्धात्मक व

पारदर्शकपणे करणे अनिवार्य राहील. म्हणजेच प्रस्तावित घटकाची रक्कम रु.१०.०० लाखाच्या आत असल्यास व शासकीय मापदंड उपलब्ध नसल्यास प्रत्यक्ष किंमतीच्या ६०% VGF देय राहील.

९) ज्या शासकीय मापदंडात जीएसटीचा समावेश नाही अशा बाबतीत GST पोटी होणाऱ्या खर्चाच्या (मापदंडाप्रमाणे ग्राह्य किंमतीच्या प्रमाणात) ६०% अनुदान अनुज्ञेय राहील.

१०) स्मार्ट सोसायटीच्या पाचव्या नियामक मंडळाच्या बैठकीतील निर्देशाप्रमाणे मंजूर उपप्रकल्पातील यंत्रसामुग्री, मशीनरी या घटकांना ज्या योजनेच्या मापदंडानुसार मंजूरी दिलेली आहे, त्यातील बाबी/उपघटक नमुद करुन सीबीओ स्तरावर संपादन करताना यांत्रिकी अभियंता किंवा समतुल्य अभियंत्यामार्फत (पदवीका / पदवीधारक) यंत्रसामुग्री, मशीनरीचे स्पेशिफीकेशन निर्धारीत करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे, त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

११) उपप्रकल्पासाठी कार्यान्वयन खर्च (Operating Expenditure) एकूण प्रस्तावित रक्कमेच्या ५% पर्यंत अधिकतम रुपये २०.०० लाखाच्या मर्यादेत मंजूर करण्यात येईल. तथापि हा खर्च ही ६०:४० प्रमाणात म्हणजे ६०% अनुदान व ४०% समुदाय आधारीत संस्थेचा स्व:हिस्सा याप्रमाणे राहील. आकस्मिक खर्चामध्ये उपप्रकल्पासाठी जागेच्या नोंदणीकृत भाडे करारासाठी आलेला खर्च, उपप्रकल्पासाठी प्रस्तावित घटकासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांचा खर्च, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आलेला खर्च, बांधकाम परवानगीसाठी भरण्यात आलेले विविध शुल्क/उपकर, आय.टी. उपकरणे, आवश्यक फर्निचर, स्मार्ट राज्यस्तरीय व विभागस्तरीय बैठकांसाठी खर्च, तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्थापक/लेखापाल नेमणूक तसेच अन्य आकस्मिक खर्च इ. बाबींचा समावेश आहे. आकस्मिक खर्च सुध्दा जागतिक बँकेच्या सीबीओ संपादन मार्गदर्शक सुचनांनुसार करणे अनिवार्य आहे.

१२) प्रकल्पाची अंमलबजावणी ही संबंधीत पीआययू सोबत प्रकल्पाने विहित केलेल्या नमुन्यात Grant Agreement नंतर करावी तसेच प्रकल्पाच्या वित्तीय व्यवस्थापन पुस्तिका आणि संपादन पुस्तिकानुसार व वेळवेळी निर्गमित मार्गदर्शक सूचनानुसार करावी.

१३) या उपप्रकल्पांना समितीने मंजुरी दिली असली तरी निकषांची / अटींची पूर्तता करून घेण्याची जबाबदारी प्रकल्प राबविणाऱ्या संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेची असेल आणि अशी पूर्तता संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेमार्फत ग्रँन्ट ॲग्रीमेंट करण्यापूर्वी होणे आवश्यक आहे.

१४) मंजूर करण्यात आलेल्या उपप्रकल्पातील घटकांसाठी अनुदानाची परिगणना शासकीय योजनांच्या सध्याच्या मापदंडाप्रमाणे ग्राह्य धरून उपप्रकल्प मंजूर केले आहेत. तथापि प्रकल्पाची उभारणी करण्यापूर्वी मापदंडात बदल झाल्यास त्या प्रमाणे अनुदानाची सुधारित परिगणना करून अनुदान देणेबाबतचा निर्णय प्रकल्पामार्फत घेण्यात येईल. हा निर्णय पूर्णतः प्रकल्पाचा राहील. तथापि त्यासाठी फेर सुधारित प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील.

१५) गोदाम घटक मंजूर केलेल्या सीबीओंना गोदाम WDRA Accredited करणे अनिवार्य राहील.

१६) सीबीओला मंजूर प्रकल्पाच्या (४०%) स्वहिस्सा निधी बँक कर्ज घेवून उभा करावयाचा असल्यास त्यांनी तात्काळ बँकेकडे रितसर कर्ज मागणी प्रस्ताव करावा. बँकेने शासनाकडून अनुदान मिळणार असलेबाबत हा मंजूरी आदेश पुरावा म्हणून ग्राह्य धरावा. त्या अनुषंगाने सीबीओने कर्ज

मंजुरीचे पत्र प्राप्त करून घ्यावे.

१७) सीबीओ स्वहिस्सा निधी स्वत: उभा करणार असेल तर स्वहिस्सा रक्कम जमा करण्यासाठी जवळच्या बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेच्या शाखेमध्ये स्वतंत्र चालू बँक खाते उघडण्यात यावे. सदर खाते सीबीओचे २ संचालक व कृषि बाबत संबंधित जिल्ह्याचे प्रकल्प संचालक आत्मा यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करणे बंधनकारक आहे.

१८) सीबीओने ग्रॅन्ट ॲग्रीमेन्टसाठी आवश्यक कागदपत्र ३० दिवसाच्या आत प्रकल्प अंमलबजावणी कक्षास सादर करावे व सीबीओनिहाय नोडल अधिकाऱ्यांनी स्वाक्षरीत केलेले ग्रॅन्ट ॲग्रीमेन्ट व त्यासोबतची सहपत्रे स्मार्ट कार्यालयास सादर करावीत.

१९) प्रकल्पाने निर्गमित केलेल्या संपादन (खरेदी) मार्गदर्शक सुचना, संपादन पुस्तिका व सामाजिक अंमलबजावणी पुस्तिकेनुसार मंजुर घटकांची खरेदी करण्यात यावी.

२०) संबधीत समुदाय आधारीत संस्थेने CBO प्रकल्पाच्या वेळोवेळी निर्गमित मार्गदर्शक सुचनांप्रमाणे उपप्रकल्पांची अंमलबजावणी करावी.

२१) संबंधित समुदाय आधारित संस्थेने उपप्रकल्पात मंजूर केलेल्या अनुदानाचा विनियोग हा उप प्रकल्पात नमूद बाबींवरच करणे बंधनकारक आहे.

२२) उप प्रकल्पातील मंजूर बाबींवर खर्च करताना देयकाची रक्कम संबंधित विक्रेत्याला (Vendor) रोखीने न देता संबंधिताच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात यावे.

२३) उपप्रकल्प उभारणीनंतर किमान १० वर्षे उपप्रकल्पामधून निर्माण झालेल्या बांधकाम /मशिनरी /औजारे/सुविधा/ मालमत्तेची पुर्व परवानगी शिवाय विल्हेवाट लावता येणार नाही.

२४) उपप्रकल्पास वेळोवेळी भेटी देण्यास आलेल्या अधिकारी/ कर्मचारी तसेच लेखापरीक्षक यांना सविस्तर माहिती लेखे उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

२५) उपप्रकल्प अंमलबजावणी करत असताना प्रकल्पास द्यावयाची माहिती / एमआयएस डाटा उपलब्ध करुन देणे बंधनकारक असेल.

२६) समुदाय आधारीत संस्थेने उपप्रकल्पातील एखादा घटक अपूर्ण ठेवल्यास (उदा.दालमील घटकात शेड उभारले परंतु दालमील स्थापित न केल्यास सदर घटक अपूर्ण समजण्यात येईल.) त्या अनुदानाचा बोजा संचालकांवर निश्चित करण्यात येईल व महसुल वसुली पध्दतीप्रमाणे अनुदान वसुल करण्यात येईल. तसेच अनुदानाचा गैरवापर केल्यास अनुदानाचे महसुल वसुली पध्दतीप्रमाणे संचालकांकडून वसुल करण्यात येईल.

२७) उपप्रकल्प राबवितेवेळी संबंधित समुदाय आधारीत संस्थेकडून प्रकल्पाची कोणत्याही प्रकारची दिशाभूल अथवा गैरव्यवहार होत असल्याचे प्रकल्पाच्या निदर्शनास आल्यास सदर उपप्रकल्पाचे मंजुर आदेश रद्द करण्याचे अधिकार प्रकल्पास असतील.

२८) सीबीओस मंजूरी आदेश दिल्यानंतर सीबीओने त्वरित स्वतंत्र चालू बँक खाते उघडणे, १८० दिवसांच्या आत स्वहिस्सा भरणे, कर्ज मंजूरी प्राप्त करणे, अनुदान करार करणे, प्रथम अनुदान हप्ता मागणी करणे तसेच समांतर पद्धतीने संपादन प्रक्रिया राबविणे इ. आवश्यक कार्यवाही झाली नाही, तर सदर सीबीओचे मंजूरी आदेश रद्द करण्यात येतील.

२९) कांदाचाळ उभारणी करताना कांदा व लसूण संशोधन संचनालय, राजगुरूनगर, पुणे, कृषि विद्यापीठे व इतर संशोधन संस्था यांचेकडून तांत्रिक मार्गदर्शन घेण्यात यावे. तांत्रिक व्यवहार्यता तपासून बघण्याची जबाबदारी सीबीओची राहील. तांत्रिक व्यवहार्यता तपासून युनिटची उभारणी करावी.

३०) ज्या सीबीओंना उपप्रकल्पामध्ये सोलार पॉवर यूनिट हा घटक मंजूर आहे. अशा सीबीओंनी सोलार पॉवर घटकाच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित होईपर्यंत या घटकाची अंमलबजावणी करु नये.

३१) ज्या सीबीओंना अवजारे बँक (Custom Hiring Centre) मंजुर आहे. अशा सीबीओंनी अवजारे संपादनानंतर प्रत्येक अवजारावर स्मार्ट प्रकल्पातून अनुदान प्राप्त असे गोंदण (Embossing) करणे अनिवार्य आहे.

३२) मंजूरी दिलेल्या सीबीओंनी BoQ सादर करण्यापूर्वी RCC व PEB Structural Design करून घ्यावे.

वरील अटी व शर्तींचे पालन करुन उपप्रकल्पाची अंमलबजावणी विहीत वेळेत करण्यात यावी.

प्रमुख
प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा, कृषि
स्मार्ट प्रकल्प तथा कृषि संचालक आत्मा
कृषि आयुक्तालय, पुणे

जा.क्र.कृ.आ./स्मार्ट/मु.उ.मं.आ/अटी शर्ती/२०३४/२०२३
दि. ०८/०७/२०२३